नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३ Issue - 3 | वार - गुरुवार दि. २८ मे २०२६ Blow- Thursday Date 28 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ऊस आणि कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांची केंद्र सरकारकडून दखल

### केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्याशी राज्याच्या प्रतिनिधींची सविस्तर चर्चा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : साखरेच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करणे, इथेनॉल कोटा वाढवणे, कर्ज पुनर्गठन, व्याज सवलत, शेतकऱ्यांकडून थेट कांदा खरेदी, शेतीमालाचे ग्रेडिंग, कांदा बियाण्यांवर अधिभार आदी शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नांबाबत केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्यासोबत झालेल्या सकारात्मक चर्चेमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार असून याबाबत लवकरच केंद्र सरकार अनुकूल निर्णय घेणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नवी दिल्ली येथे महाराष्ट्रातील साखर कारखानदारी, ऊस आणि कांदा उत्पादक शेतकरी यांच्या विविध अडचणींसंदर्भात केंद्रीय सहकार मंत्री शाह यांच्यासोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह संबंधित मंत्री आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींची चर्चा झाली.

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान आणि केंद्रीय सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी हेही या बैठकीस उप-स्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, पणन मंत्री जयकुमार रावल, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र सिंह भोसले, खा. धनंजय महाडिक, आ. दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, डॉ. राहुल आहेर, राहुल कुल, अभिमन्यु पवार, डॉ.विनय कोरे, राजेश टोपे, राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, राज्य सहकारी साखर महासंघाचे जयप्रकाश दांडेगावकर, रणजितसिंह निंबाळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे अतिरिक्त मुख्य सचिव लोकेश चंद्र, सुहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सहकार आयुक्त दीपक तावरे, कृषी आयुक्त सुरज मांढरे, साखर आयुक्त संजय कोलते आदी उपस्थित होते.

साखरेच्या प्रश्नांवर केंद्रीय सहकार मंत्र्यांसोबत अत्यंत सकारात्मक चर्चा झाल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साखरेची किमान आधारभूत किंमत वाढवणे गरजेचे असल्याचे केंद्रीय मंत्री शाह यांनी मान्य केले आहे. इथेनॉलचा कोटा मोठ्या प्रमाणात वाढवण्यासाठी येत्या दोन महिन्यांत निर्णय घेण्याबाबत त्यांनी सहमती दर्शवली असून कर्ज पुनर्गठनासंदर्भात राज्य शासनासोबत एकत्रितपणे काम करून मार्ग काढण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. त्यासह व्याज सवलतीचे (इंटरेस्ट सबव्हेंशन ) पैसे तात्काळ देण्याचे मान्य करण्यात आले करण्यात आले आहे. 'क्वेल प्राइजिंग' (किंमत नियंत्रण) संदर्भात केंद्राने एक प्रस्ताव मागवला असून, राज्य शासनाकडून तो तयार केला आहे व लवकरच सादर केला जाईल. या प्रकल्पामुळे साखर कारखानदारीचे अनेक प्रश्न सुटण्यास मदत होईल.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांवरही सकारात्मक निर्णय झाले असल्याची माहिती देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाफेड आणि एनसीसीएफने सुरू केलेली कांदा खरेदी बाजारात थेट व्यापाऱ्यांकडून न होता, थेट शेतकऱ्यांकडून केली पाहिजे ही मागणी मान्य करण्यात आली आहे. २ लाख टनांऐवजी १० लाख टन कांदा खरेदी नाफेड आणि एनसीसीएफने करावी, यावर सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा आहे. सध्या कांद्याचे बियाणे मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्याने देशांतर्गत कांद्याला एक्सपोर्ट मार्केट उरत नाही. यासाठी कांदा बियाण्यावर मोठ्या प्रमाणात 'एक्सपोर्ट सरच-ार्ज' लावला पाहिजे, ही मागणी देखील मान्य करण्यात आली आहे. तसेच कांद्याचा खरेदी भाव नुकताच वाढवून १५ रुपये ८० पैसे करण्यात आला आहे. तो आणखी कसा वाढवता येईल यावर चर्चा झाली. कांद्याच्या बियाणांवर निर्बंध असले, तरी कांद्याच्या निर्यातीवर (कांदा पाठवण्यावर) कोणतीही बंदी नाही, असे या चर्चेत स्पष्ट करण्यात आले.

नाफेड किंवा एनसीसीएफमध्ये ग्रेडिंगच्या नावाखाली माल निकृष्ट दर्जाचा दाखवून खरेदी नाकारली जाते, अशी शेतकऱ्यांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून आता यंत्रसामुग्रीच्या माध्यमातून ग्रेडिंग केले जाईल, ज्याम ुळे शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार असल्याबाबत समाधान व्यक्त करून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आंबा आणि हापूस आंब्यासंदर्भात निर्माण झालेल्या प्रश्नांबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान यांनाही यावेळी निवेदन देण्यात आले. विमा कंपन्यांनी घातलेल्या जाचक अटींमध्ये बदल केल्यास आंबा उत्पादकांना मोठा दिलासा मिळू शकतो, हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यावर केंद्रीय मंत्र्यांनी विमा कंपन्यांची बैठक घेऊन योग्य मार्ग काढण्याचे आश्वासन दिले असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची घोषणा

## महाविकास आघाडी विधानपरिषदेच्या सर्व जागा लढवणार; दोन दिवसात निर्णय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांम धून विधान परिषदेवर निवडून द्यायच्या १६ जागा आणि नागपूरमधील एका जागेची पोटनिवडणूक अशा सर्व १७ जागांवर महाविकास आघाडी एकत्रितपणे निवडणूक लढवणार आहे. या निवडणुकीच्या जागावाटपाची प्राथमिक चर्चा म ुंबईतील काँग्रेसचे मुख्यालय असलेल्या 'टिळक भवन' येथे पार पडली. येत्या दोन दिवसांत पुन्हा बैठक घेऊन सर्वसंमतीने अंतिम जागावाटप जाहीर केले जाईल, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी दिली.

या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, खासदार सुप्रिया सुळे, तसेच उबठाचे आमदार अनिल परब, अंबादास दानवे आणि मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. या बैठकीत विधान परिषद निवडणुकीच्या रणनीतीसह इतर महत्त्वाच्या राजकीय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.प्राथमिक चर्चेनुसार, महाविकास आघाडीतील १७ जागांपैकी काँग्रेस सात ते आठ जागांवर निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. तर उबाठा गट पाच ते सहा आणि शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस तीन ते चार जागांवर आपले उम ेदवार उभे करणार असल्याची माहिती समोर आली आहे. कोणत्या पक्षाला कोणती जागा सुटणार, याचा अंतिम निर्णय २९ तारखेला होणाऱ्या मविआ नेत्यांच्या पुढील बैठकीत स्पष्ट होणार आहे.

## केरळचे माजी सीएम पी. विजयन यांच्यावर ईडीची छापेमारी; समर्थकांचा ईडीच्या पथकावर हल्ला, कारवर वीटा फेकल्या



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तिरुअनंतपुरम : केरळमधील तिरुवनंतपुरम येथे माजी मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकण्यासाठी आलेल्या अंमलबंदी संचालनालयाच्या (ईडी) पथकावर विजयन यांच्या समर्थकांनी हल्ला केला. १२ सदस्यीय पथकाने आज बेकरी जंक्शन येथील विजयन यांच्या निवासस्थानी छापा टाकला. त्यांच्या मुलीच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीशी संबंधित मनी लाँड्रिंग प्रकरणात हे छापे टाकण्यात आले. हे प्रकरण 'कोचीन मिनरल्स अँड रुटाइल लिमिटेड' (सीएमआरएल) द्वारे केलेल्या मनी लाँड्रिंगशी संबंधित आहे.

केरळ उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

ईडीचा तपास रद्द करण्याची मागणी कंपनीने केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी, मंगळवारी केरळ उच्च न्यायालयाने सीएमआरएलची याचिका फेटाळली. ईडीने या प्रकरणात २०२४ मध्ये गुन्हा दाखल केला होता. सीएमआरएल नावाच्या कंपनीने २०१८-१९ दरम्यान विजयन यांची मुलगी टी. वीणा यांच्या 'एक्झालॉजिक सोल्युशन्स' या आयटी कंपनीला ₹१.७२ कोटी दिले. कोणतेही सॉफ्टवेअर किंवा आयटी सेवा न देता, हे पैसे बनावट खर्च म्हणून देण्यात आले असल्याचा आर-ोप आहे. हा खुलासा झाल्यानंतर, ईडीने पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

ईडीने २०२४ मध्ये पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला

या आरोपांची चौकशी करण्यासाठी ईडीने २०२४ मध्ये पीएमएलए अंतर्गत गुन्हा दाखल केला. हा मुद्दा विजयन सरकारसमोरील सर्वात राजकीयदृष्ट्या संवेदनशील वादांपैकी एक राहिला आहे. ईडीच्या तपासाव्यतिरिक्त, गंभीर फसवणूक तपास कार्यालय (एसएफआयओ) देखील या प्रकरणाचा तपास करत आहे.

## होर्मुझ सामुद्रधुनीची नाकेबंदी संपुष्टात येणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन डीसी : इराणला बेचिराख करण्याची आणि त्यांची संस्कृती संपवून टाकण्याची धम की देणाऱ्या अमेरिकेने माघारीचे संकेत दिले आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी यूएस नेव्ही अर्थात अमेरिकेचे नौदल इराणपासून दूर नेण्याची तयारी सुरू केल्याचे वृत्त आहे. युद्ध थांबवण्यासाठी होर्मुझ सामुद्रध-ुनीची नाकेबंदी संपुष्टात आणून तणाव दूर करण्यासाठी अमेरिका इराणपासून दूर जाण्याची तयारी करत आहे. अमेरिकेच्या नौदलाने माघार घेतली तर महिन्याभरात होर्मुझमार्गे आधी होत होती त्याच पद्धतीने मोठ्या प्रमाणात जलवाहतूक होऊ शकेल, असा विश्वास इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीने व्यक्त केला आहे.

अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदीसाठी पुढील दोन महिन्यांत अंतिम करार झाला तर संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेकडून त्याला बंधनकारक ठराव म्हणून मंजुरी दिली जाईल. सामंजस्य करारानुसार, अमेरिकन सैन्य इराणच्या परिसरातून माघार घेईल आणि नौदल नाकेबंदी उठवली जाईल. या बदल्यात, इराणने एका महिन्याच्या आत होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या व्यापारी जहाजांची संख्या युद्धापूर्वीच्या पातळीवर आणण्याचे वचन दिले आहे.

अमेरिका आणि इस्रायल या दोन देशांनी २८ फेब्रुवारी २०२६ पासून इराणवर हवाई हल्ले सुरू केले. या हल्ल्यांनीच पश्चिम आशियात नव्या युद्धाला तोंड फुटले. इराणने इस्रायलवर तसेच अमेरिकेच्या आखाती देशांतील तळांवर हवाई हल्ले सुरू केले. एकमेकांचे सामर्थ्य नष्ट करण्याचे प्रयत्न सुरू झाले. युद्धाला तोंड फुटताच होर्मुझ सामुद्रधुनीतील जलवाहतुकीवर प्रतिकूल परिणाम झाला. ही संधी साधत इराणने होर्मुझ साम ुद्रधुनीमार्गे त्याच्या मर्जीशिवाय जलवाहतूक होणार नाही, असे जाहीर केले. याचा प्रतिकूल परिणाम जागतिक पातळीवर झाला. अनेक देशांमध्ये महागाई उसळली. युद्ध लांबू लागले तसे अनेक देशांतील नागरिकांसाठी जगणे कठीण होऊ लागले. इंधन पुरवठ्यावर प्रतिकूल परिणाम झाला. युद्धादरम्यान एकमेकांचे खच्चीकरण करण्याच्या प्रयत्नात अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्या महत्त्वाच्या तेलसाठ्यांवर तसेच तेल शुद्धीकरण प्रकल्पांवर हवाई हल्ले झाले.

वृद्ध आणि कुटुंबाची विशेष काळजी घ्या

उष्माघाताच्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका

## पंतप्रधान नरेंद्र मोदीकडून देशवासियांना उष्णतेच्या लाटेत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाच्या अनेक भागांतील तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटेमुळे लोकांच्या अडचणी वाढल्या आहेत. उत्तर भारतापासून मध्य भारतापर्यंत कडक ऊन आणि उष्ण वाऱ्यांचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे. उत्तर प्रद-ेशातील बांदा हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४७.६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. दिल्ली, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि पंजाबसह अनेक राज्यांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना या उष्णतेच्या लाटेत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशाच्या विविध भागांमध्ये तापमान सतत वाढत आहे, ज्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी वाढत आहेत. त्यांनी लोकांना शक्य तितके सतर्क राहण्याचा आणि शरीरात पाण्याची पातळी टिकवून ठेवण्याचा सल्ला दिला.

घरातून बाहेर पडताना पाणी सोबत ठेवा

पंतप्रधानांनी लोकांना घराबाहेर पडताना नेहमी पाणी सोबत ठेवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, या हवामानात संवेदनशीलता आणि परस्पर सहकार्य मोठा आधार ठरू शकतो. पंतप्रधान मोदींनी जनतेला आवाहन केले की, शक्य असल्यास तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी द्यावे. जे लोक आपल्या घराबाहेर आणि दुकानाबाहेर घागरींमध्ये पाणी ठेवतात जेणेकरून ये-जा करणारे लोक ते पिऊ शकतील, त्यांचेही त्यांनी कौतुक केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, तीव्र उष्णतेमुळे होणारी चक्कर, मळमळ किंवा अत्यधिक थकवा यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. त्यांनी सल्ला दिला की, जर कोणी अच-ानक बेशुद्ध पडले, अशक्त वाटले किंवा त्यांची प्रकृती ठीक दिसत नसेल, तर त्यांना ताबडतोब थंड आणि सावलीच्या ठिकाणी घेऊन जावे आणि आराम मिळावा यासाठी पाणी, ओआरएस किंवा इतर द्रव-पदार्थ द्यावेत. पंतप्रधान म्हणाले की, लहान मुले, वृद्ध आणि उन्हात काम करणाऱ्यांना या तीव्र उष्णतेचा सर्वाधिक त्रास होतो. यावर त्वरित उपाय न केल्यास, या स्थितीमुळे उष्माघातासारखी गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. ते म्हणाले की, अशा वेळी लोकांची सतर्कता आणि काळजी जीव वाचवू शकते.

पंतप्रधान मोदींनी लोकांना आवाहन केले की, जेव्हा शक्य असेल तेव्हा त्यांनी आपल्या आई-वडिलांची, आजी-आजोबांची आणि इतर प्रियजनांची विचारपूस करावी. त्यांनी वृद्धांना सुरक्षित राहण्यासाठी पुरेसे पाणी पिण्याचा, दुपारच्या कडक उन्हात जाणे टाळण्याचा आणि शक्य तितकी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला.

प्राणी आणि पक्ष्यांसाठीही पाणी ठेवा

पंतप्रधान म्हणाले की, या तीव्र उन्हात प्राणी आणि पक्ष्यांची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. त्यांनी लोकांना घराबाहेर, बाल्कनी, गच्ची, दुकाने किंवा कार्यालयांबाहेर पाण्याने भरलेले एक लहान भांडे ठेवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, हा छोटासा प्रयत्न एका तहानलेल्या पक्ष्यासाठी जीवनरक्षक ठरू शकतो. पंतप्रधान मोदींनी देशवासियांना या कठीण काळात संवेदनशीलतेने आणि करुणेने एकमेकांची काळजी घेण्याचे आवाहन केले.

## संपादकीय....

### पंतप्रधानांकडून आवाहन

देशाच्या अनेक भागांतील तीव्र उष्णता आणि उष्णतेच्या लाटेमुळे लोकांच्या अडचणी वाढल्या आहेत. उत्तर भारतापासून मध्य भारतापर्यंत कडक ऊन आणि उष्ण वाऱ्यांचा परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे. उत्तर प्रदेशातील बांदा हे देशातील सर्वात उष्ण शहर ठरले, जिथे तापमान ४७.६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. दिल्ली, हरियाणा, राजस्थान, मध्य प्रदेश आणि पंजाबसह अनेक राज्यांमध्ये तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना या उष्णतेच्या लाटेत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. पंतप्रधान मोदी म्हणाले की, देशाच्या विविध भागांमध्ये तापमान सतत वाढत आहे, ज्यामुळे लोकांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी वाढत आहेत. त्यांनी लोकांना शक्य तितके सतर्क राहण्याचा आणि शरीरात पाण्याची पातळी टिकवून ठेवण्याचा सल्ला दिला. पंतप्रधानांनी लोकांना घराबाहेर पडताना नेहमी पाणी सोबत ठेवण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, या हवामानात संवेदनशीलता आणि परस्पर सहकार्य मोठा आधार ठरू शकतो. पंतप्रधान मोदींनी जनतेला आवाहन केले की, शक्य असल्यास तहानलेल्या व्यक्तीला एक ग्लास पाणी द्यावे. जे लोक आपल्या घराबाहेर आणि दुकानाबाहेर घागरींमध्ये पाणी ठेवतात जेणेकरून ये-जा करणारे लोक ते पिऊ शकतील, त्यांचेही त्यांनी कौतुक केले. तीव्र उष्णतेमुळे होणारी चक्कर, मळमळ किंवा अत्यधिक थकवा यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. त्यांनी सल्ला दिला की, जर कोणी अचानक बेशुद्ध पडले, अशक्त वाटले किंवा त्यांची प्रकृती ठीक दिसत नसेल, तर त्यांना ताबडतोब थंड आणि सावलीच्या ठिकाणी घेऊन जावे आणि आराम मिळावा यासाठी पाणी, ओआरएस किंवा इतर द्रवपदार्थ द्यावेत. पंतप्रधान म्हणाले की, लहान मुले, वृद्ध आणि उन्हात काम करणाऱ्यांना या तीव्र उष्णतेचा सर्वाधिक त्रास होतो. यावर त्वरित उपाय न केल्यास, या स्थितीमुळे उष्माघातासारखी गंभीर समस्या निर्माण होऊ शकते. ते म्हणाले की, अशा वेळी लोकांची सतर्कता आणि काळजी जीव वाचवू शकते. जेव्हा शक्य असेल तेव्हा त्यांनी आपल्या आई-वडिलांची, आजी-आजोबांची आणि इतर प्रियजनांची विचारपूस करावी. त्यांनी वृद्धांना सुरक्षित राहण्यासाठी पुरेसे पाणी पिण्याचा, दुपारच्या कडक उन्हात जाणे टाळण्याचा आणि शक्य तितकी विश्रांती घेण्याचा सल्ला दिला.

# मोदी खरे धुरंदर, त्यांच्यावर टीका करणारे दलिंदर, हर्षवर्धन सकपाळ यांच्या मोदीवरील टीकेला उपमुख्यमंत्री शिंदेंचे प्रत्युत्तर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या बारा वर्षांत देशाचे यशस्वीपणे नेतृत्व करत भारताला विकास, आत्म निर्भरता आणि जागतिक प्रतिष्ठेच्या नव्या उंचीवर नेले आहे. त्यामुळे मोदी हे खरे ''धुरंदर'' असून त्यांच्यावर टीका करणारेच खऱ्या अर्थाने ''दलिंदर'' आहेत, अशी खरबरीत आणि आक्रमक टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सकपाळ आणि विरोधकांवर केली. मुंबई येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मोदींवरील टीकेचा तीव्र शब्दांत समाचार घेतला. शिंदे म्हणाले,''देशहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारे नरेंद्र मोदी हे आज जगातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांपैकी एक आहेत.

गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून १३ वर्षे आणि देशाचे पंतप्रधान म्हणून १२ वर्षे त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला आहे. भारताला महासत्तेकडे नेण्याचे, आत्मनिर्भर भारत उभारण्याचे आणि देशाची अर्थव्यवस्था मजबूत करण्याचे ऐतिहासिक कार्य मोदीजींनी केले आहे.''

विरोधकांवर निशाणा साधताना त्यांनी म्हटले की, ''ज्यांनी आयुष्यात देशासाठी कोणतेही भरीव योगदान दिले नाही, ते आज मोदीजींवर टीका करत आहेत. 'कहाँ राजा भोज और कहाँ गंगू तेली' अशीच त्यांची अवस्था आहे. मोदीजींवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर थुंकण्याचा प्रकार आहे. अशा टीकांमुळे मोदींची प्रतिमा कमी होणार नाही, उलट विरोधकांची राजकीय दिवाळखोरीच उघड होत आहे.''

''मोदीजींनी देशाला भ्रष्टाचारमुक्त आणि निर्णयक्षम नेतृत्व दिले. संरक्षण क्षेत्रात भारताला आयातदारातून निर्यातदार बनवले. पायाभूत सुविधा, डिजिटल क्रांती, परराष्ट्र धोरण आणि आर्थिक सुधारणांमुळे भारताची जागतिक पातळीवरील ताकद वाढली आहे. बारा वर्षांच्या कार्यकाळात मोदीजींवर भ्रष्टाचाराचा एकही डाग लावता आलेला नाही. हीच त्यांच्या नेतृत्वाची सर्वात मोठी पावती आहे, असेही शिंदे म्हणाले.

काँग्रेस नेत्यांच्या वक्तव्यांचा समाचार घेताना त्यांनी स्पष्ट केले की, ''देशाच्या पंतप्रधानांवर खालच्या दर्जाची भाषा वापरणे ही भारतीय संस्कृती नाही. राजकीय विरोध असू शकतो, पण वैयक्तिक पातळीवर घसरून केलेली टीका जनता कधीही



सहन करणार नाही. १४० कोटी भारतीय मोदीजींच्या कामगिरीचे साक्षीदार आहेत आणि योग्य वेळी विरोधकांना उत्तर देतील.''

# एसटीमध्ये डिझेल बचतीसाठी राज्यव्यापी मोहीम राबविणार : मंत्री प्रताप सरनाईक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाढत्या इंधन खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी 'इंधन बचतष्ठ म्हणजेच इंधन निर्मिती' ही व्यापक संकल्पना प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्रालयातील दालनात एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. एसटी महामंडळाला सध्या दररोज सरासरी १०.८७ लाख लिटर डिझेलची आवश्यकता भासत असून, इंधन खर्च कमी करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री सरनाईक म्हणाले की, एसटीच्या प्रत्येक आगाराने दररोज किमान पाच लिटर डिझेल बचतीचे उद्दिष्ट निश्चित केले, तरी संपूर्ण राज्यभरातून दररोज किमान १ हजार लिटर डिझेलची बचत होऊ शकते. सध्याच्या डिझेल दरानुसार ही बचत दररोज जवळपास १ लाख रुपयांपर्यंत जाऊ शकते. ''लहान बचतीतून मोठी आर्थिक शिस्त निर्माण होते आणि हीच बचत भविष्यात एसटीसाठी मोठी ताकद ठरू शकते,'' असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

या पार्श्वभूमीवर सर्व विभाग नियंत्रक आणि आगार व्यवस्थापकांना तातडीने आगारनिहाय डिझेल बचतीची उद्दिष्टे निश्चित करण्यात येतील. प्रत्येक आगाराकडून आपल्या बस गाड्यांच्या इंधन वापराचे नियमित विश्लेषण करून बचतीसाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील. त्याचबरोबर, डिझेल बचतीमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या चालकांचा विशेष सत्कार करण्यात येईल, तसेच त्यांना प्रोत्साहनपर भत्ता देण्याची योजनाही सुरू करण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

याचबरोबर, ज्या आगारांनी निश्चित उद्दिष्टांपेक्षा अधिक डिझेल बचत केली असेल, त्या आगारांना दरमहा विशेष पुरस्कार आणि आर्थिक प्रोत्साहन देण्यात येणार आहे. यामुळे आगारांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण होऊन बचतीची चळवळ अधिक प्रभावी होईल, असा विश्वास मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

वाहन चालविण्याच्या चुकीच्या पद्धतीमुळे ज्या चालकांच्या बसचे केपीएल (किलोमीटर प्रति लिटर) प्रमाण कमी येत असेल, अशा चालकांचे समुपदेशन करून त्यांना पुनर्प्रशिक्षण देण्यात येणार आहे. इंधन बचतीसाठी वेग नियंत्रण, योग्य गिअरचा वापर, अनावश्यक इंजिन सुरू ठेवणे टाळणे, ब्रेकिंग पद्धतीत सुधारणा यासारख्या बाबींवर विशेष प्रशिक्षण दिले जाईल. तसेच बसेसची दैनंदिन तांत्रिक तपासणी, वेळेवर दुरुस्ती आणि इंजिन कार्यक्षमतेची नियमित पाहणी यावर भर देण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. टायर प्रेशर, इंजिन ट्यूनिंग, ऑईल गळती, ब्रेक प्रणाली यासारख्या तांत्रिक बाबींमधील त्रुटीमुळेही इंधनाचा अपव्यय होतो. त्यामुळे कार्यशाळा स्तरावर अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# कौठाळी येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा वृक्ष भेट देऊन सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवक्रांती परिवाराच्या वतीने दहावी बारावी पास गुणवंत विद्यार्थ्यांचा वृक्ष भेट देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास माजी सरपंच स्वाती धुमाळ, शेतकरी सेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष सागर गोडसे, मेजर दादासाहेब नागटिळक, पोलीस पाटील श्रीकांत नागटिळक, तंटामुक्त समितीचे माजी अध्यक्ष पांडुरंग नागटिळक, सामाजिक कार्यकर्ते सुभाष गोडसे, शेतकरी संघटना अध्यक्ष शिवाजी नागटिळक, भोई समाज संघटनेचे अध्यक्ष हरी सलमपुरे, सामाजिक कार्यकर्ते दत्तात्रय धुमाळ, समाधान चव्हाण, शंकर वाघमारे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते, शिक्षक, पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. वृक्ष लागवड व संवर्धन चळवळ गतिमान व्हावी यासाठी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार वृक्ष भेट देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार शिवक्रांती परिवाराचे अध्यक्ष रामदास नागटिळक यांनी मानले.

# चाऱ्यासाठी सरकारी जमिनीवर आता गवत लागवड!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गाव, महानगरांसह जंगलांना लागून असलेल्या सरकारच्या सर्व पडीक व महसुली जमिनींवर आता मोठ्या प्रमाणावर 'नेपियर ग्रास' आणि बांबूची लागवड करण्याचा महत्वाकांक्षी निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंगळवारी घेतला. विशेष म्हणजे, ही जमीन स्थानिक महिला बचत गट, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) तसेच सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्थांना तीन वर्षांच्या भाडेपट्ट्यावर दिली जाणार आहे. राज्यातील चारा टंचाईच्या समस्या तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देण्यासाठी उपाय योजना करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्याने मंत्रालयातील महसूलमंत्री बावनकुळे यांच्या दालनात ही बैठक पार पडली. बैठकीला अर्थराज्यमंत्री आशिष जयस्वाल आणि मंत्रालयातील विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, राज्यातील दुग्धव्यवसायाला गती देण्यासाठी दर्जेदार चाऱ्याची उपलब्धता असणे अत्यंत आवश्यक आहे. चांगले दूध पाहिजे असेल, तर चांगला चारा मिळणे गरजेचे आहे, हा मूळ हेतू डोळ्यासमोर ठेवून या योजनेचे नियोजन करण्यात आले आहे. या नव्या धोरणामुळे राज्यातील एकही सरकारी महसुली जागा किंवा शेती क्षेत्रातील शासकीय जमीन पडीक राहणार नाही. या जमिनींचा वापर केवळ चारा आणि बांबू लागवडीसाठीच नव्हे, तर रोपवाटिका (नर्सरी), अपारंपरिक ऊर्जा स्रोत आणि सेंद्रिय खत निर्मिती यांसारख्या पर्यावरणपूरक व रोजगारभिमुख प्रकल्पांसाठी केला जाणार आहे.

**त्रिपक्षीय करार**

राज्यातील संपूर्ण सरकारी जमिनींची तातडीने मोजणी करण्यात येणार असून, सर्व शासकीय जमिनींवर 'शासकीय मालमत्ता' असल्याचे फलक (बोर्ड) लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत.जमिनी भाडेपट्ट्याने देण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), गट विकास अधिकारी आणि संबंधित कार्यकारी यंत्रणा यांच्यात एक मजबूत त्रिपक्षीय करार केला जाईल. महसूल विभागाच्या वतीने उपजिल्हाधिकारी या कराराची कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करतील. शासकीय जमिनींसोबतच आता शेतकऱ्यांना किंवा कोणत्याही भूधारकाला आपली खासगी जमीन विनाकारण पडीक किंवा रिकामी ठेवता येणार नाही; तिचा योग्य शेती किंवा चारा उत्पादनासाठी वापर करणे बंधनकारक असेल.

**शहरी प्राधिकरणांच्या जागांचाही होणार वापर**

या महत्त्वाकांक्षी योजनेची व्याप्ती केवळ ग्रामीण भागापुरती मर्यादित नसून, शहरी व निमशहरी प्राधिकरणांच्या क्षेत्रांतही ती लागू केली जाणार आहे. एमएमआरडीए, पीएमआरडीए, एनएमआरडीए, सिडको आणि इतर सर्व स्थानिक प्राधिकरणांच्या अखत्यारीत येणाऱ्या महसूल विभागाच्या सर्व मोकळ्या व पडीक जागा या प्रकल्पासाठी ताब्यात घेऊन वापरल्या जातील.महिला बचत गट आणि बेरोजगार तरुणांना रोजगाराचे मोठे साधन उपलब्ध होणार आहे. पडीक जमिनींचा हा हरित कायापालट राज्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासाला एक नवी दिशा देणारा ठरेल, असे चंद्रशेखर बावनकुळे, महसूलमंत्री यांनी सांगितले.

**चिंचणीत 'डॉ. बी.डी.जत्ती महाविद्यालया'चा 'माजी विद्यार्थी मेळावा' संपन्न**

**प्रा. वैशाली घोंगडे यांचे प्रतिपादन**

# माजी विद्यार्थी मेळाव्याच्या कार्यक्रमातून जीवनाला ऑक्सिजन मिळते

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'महाविद्यालय जीवन संपल्यानंतर नोकरी करताना जीवनात अनेक चढ उतार येत असतात. परिवार आणि महाविद्यालयाचे काम काज सांभाळणे हे करताना तारेवरची कसरत करावी लागते. अशावेळी प्रत्येकाला सामोरे जाणे हे एक प्रकारचे आव्हान असते. हे आव्हान जीवंत ठेवण्यासाठी आपल्या बाल मित्र-मैत्रिणीच्या विचारांची देवान घेवाण होणे गरजेचे असते. म्हणून निदान वर्षातून एकदा तरी माजी विद्यार्थी मेळावा कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. कारण अशा मेळाव्यातून जीवनाला एक प्रकारे ऑक्सिजन मिळते आणि हेच ऑक्सिजन वर्षभर पुरते.' असे प्रतिपादन मोहोळ येथील नागनाथ विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रा. वैशाली घोंगडे यांनी केले.

बिजापूर (कर्नाटक) मधील दक्षिण भारत हिंदी प्रचार सभा संचलित डॉ. बी.डी.जत्ती बी.एड. महाविद्यालयातील सन १९९६ च्या बॅच मधील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा चिंचणी (ता. पंढरपूर) मधील निसर्गरम्य परिसर असलेल्या 'चिंचणी ग्रामीण कृषी पर्यटन केंद्रात' हा 'माजी विद्यार्थी मेळावा' संपन्न झाला. याप्रसंगी मुख्य आयोजिकेच्या भूमिकेतून प्रा. वैशाली घोंगडे मार्गदर्शन करत होत्या. राष्ट्रपती पुरस्कार विजेते व तत्कालीन प्राचार्य डॉ. व्ही.आर. देवगिरी यांच्या कडक शिस्ती पासून ते विद्यार्थ्यांच्या चुकांवर पांघरून घालणारे व वेळ परिस्थिती पाहून समजून-उमजून घेणारे गुरुजन वर्गांच्या आठवणी या 'मेळाव्या'च्या माध्यमातून निघाल्या. पंढरपूर-पुणे हायवे लगत असलेल्या पिराची कुरोली ते टप्पा पासून दिड किमी अंतरावर असलेल्या चिंचणी मधील दाट हिरवळींनी वेढलेल्या शासनाच्या कृषी पर्यटन केंद्रात हा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात ना पैशाची घमंड, ना पदाचा गर्व दिसून आला, दिसत होती केवळ मैत्री! प्रशासकिय अधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक, नगरसेवक, उद्योजक, पोलीस अधिकारी, कर्मचारी तर शिक्षण-तज्ज्ञ, संस्थापक, हे सर्वजण सर्व एका वनराईत जमा झाले होते. यांध्ये काहीजण शिक्षणक्षेत्र सोडून स्वतःची कंपनी. मार्केटिंग फिल्ड, एस.टी. महामंडळ, यामध्ये स्थिरावले आहेत. शिक्षण क्षेत्रा बरोबरच वेगवेगळ्या क्षेत्रात विविध पदावर काम करत असलेले हे सर्व मित्र आज 'माजी विद्यार्थी मेळाव्या'च्या चिंचणीच्या निमित्ताने हिरव्या गार पर्यटन केंद्रात एकत्रित आले होते. महाविद्यालयात शिक्षण घेत असताना आलेल्या अनुभवांचा पुढे कसा फायदा झाला हे काहींनी सांगितले 'माजी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून 'पैसे सर्वचजण मिळवतात, परंतु अनुभव हा स्वतःलाच मिळवावा लागतो. त्यासाठी स्वतःलाच प्रचंड परिश्रम करण्याची गरज असते. कारण आईच्या कुशीनंतर महाविद्यालयीन जीवनातच



प्रेम, आपुलकी मिळते. प्राध्यापकांनी वेळ प्रसंगी आम्हाला घडविण्यासाठी आमच्या भवितव्यासाठी घेतलेल्या कठोर निर्णयाचा सुरवातीला राग आला परंतु आम्ही ज्यावेळी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांसमोर उभे राहतो त्यावेळी येथील शिस्त व केलेले संस्कार याचा खूप फायदा होतो हे लक्षात आले.' असेही उदगार काहींनी काढले. ताण तणाव, कामाचा लोड बाजूला सारून मेळाव्याच्या निमित्ताने सर्वजण एकत्रित



आले होते. आचार विचारांची देवाण घेवाण करत दिवस सरला. दिवसभर आयोजिलेल्या कार्यक्रमात अनेकांनी जुन्या आठवणींना उजाळा देत काहींनी भलेमोठे भाषण ठोकले तर काहींनी सुरेल गीत गायले.



या बहारदार मेळाव्यात राजश्री टीकांबरे, शशिकला कसबे, नयना देशमाने, उज्वला गोरे, सुधाराणी बगली, रेश्मा मुल्ला, सुरेखा स्वामी, अनिता कारंडे, शांता म्हेत्रे, सुमेधा तांबडे, यमुना राठोड, लक्ष्मण भोसले, विकास जावळे, अभिमान तांबडे, सुखदेव वलेकर, धनंजय जाधव, प्रवीण साठे, अभिमान तांबडे, ताराचंद राठोड, गुलाबसिंग चव्हाण, गुणवंत कदम, शहाजी बिडवे, अंताराम चव्हाण, संजय सुडे, दिलीप मोकाशी, मनोज जोशी, निसार कडेगावकर, धनंजय देठे, विश्वजित लिंगराज, भारत राठोड, संतोष हलकुडे यांच्यासह सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, लातूर, पुणे, धाराशिव आदी जिल्ह्यातील जवळपास ७० माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. शशिकांत मल्लाडे यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# कमला एकादशी निमित्त विठ्ठल मंदिर आकर्षक फुल सजावटीने उजळले


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अधिक तथा पुरुषोत्तम मासातील कमला एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. श्री विठ्ठल भक्त पुणे येथील राम जांभुळकर यांनी सेवाभावी तत्त्वावर फुलांची व पानांची भव्य सजावट केली आहे.

या सजावटीसाठी झेंडू, शेवंती, ॲस्टर, गुलाब, निशिगंधा, तगर, लक्ष्मी कमळ, तुळशी, सूर्यफूल, ऑर्किड, अँथोरियम, कार्नेशन, जिप्सो, जरबेरा, कामिनी, अशोकाची पाने, ड्रेसिना, टेबल पाम, पिंक डेझी, ब्लू डेझी, सॅगऑफ, म नीप्लांट आदी बावीस प्रकारच्या फुलांचा व पानांचा वापर करण्यात आला आहे.

मंदिरातील चौखांबी, चोळखांबी, श्री संत नामदेव पायरी, व्हीआयपी गेट तसेच इतर प्रमुख ठिकाणी सुमारे एक ते दीड टन विविध फुले वापरून आकर्षक सजावट करण्यात आली असल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली .

## कमला एकादशीनिमित्त शिवसेना जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे यांच्या वतीने भाविकांना फराळ वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आज बुधवार दिनांक २७ /५/ २०२६रोजी पुरुषोत्तम मासातील कमला एकादशीचे औचित्य साधून श्री संत तुकाराम भवन येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती संचालित अन्नछत्रे येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख पंढरपूर श्री संभाजी राजे यांनी अन्नछत्र करिता लागणारी फराळाचे सर्व साहित्य देऊन भाविकांना वारकरी भक्तांना फराळ वाटप केला.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गुरुवारी ह .भ. प. गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, मंदिर समितीचे व्यवस्थापक श्री प्रवीण कुमार घम, लेखाधिकारी श्री मुकेश आशेचा, विभाग प्रमुख श्री विनोद पाटील व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

## कौठाळी येथे खिलार गायीचे डोहाळे जेवण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथे राधा प्रेमी व मेटकरी परिवाराच्या वतीने राधा खिलार गाईचे डोहाळे जेवण घालण्यात आले. प्रारंभी राधा खिलार गाईचे महिलांच्या हस्ते पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली

गाईचे डोहाळे जेवण हा भारतीय कृषी संस्कृतीचा एक आगळा वेगळा आणि भावुक सोहळा खिलार प्रेमी भिमराव मेटकरी, नारायण मेटकरी यांच्या घरी उत्साहात संपन्न झाला. राधा गाईच्या डोहाळे जेवणासाठी महिला व शेतकरी वर्गांना निमंत्रण देण्यात आले होते. हा सोहळा मेटकरी परिवाराने सणासारखा साजरा केला.

या कार्यक्रमासाठी कौठाळी गावातील महिला, शेतकरी व खिलारे प्रेमी बांधवांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.



## जागतिक लुप्तप्राय प्रजातीदिनानिमित्त लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाची माळढोक अभयारण्याला शैक्षणिक भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचालित म हात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन म हाविद्यालयाच्या वतीने जागतिक लुप्त प्रजा- ती दिनानिमित्त प्रथम मोर्चातील विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने नामशेष होण्याच्या मार्गावर असलेल्या माळढोक या पक्ष अभयारण्याला नानज येथे भेट दिली व या दिवसाचा मुख्य उद्देश नष्ट होत असलेल्या प्राणी आणि वनस्पतीच्या प्रजाती विषयी लोकांमध्ये जागृती निर्माण करणे आणि त्यांचे संरक्षण करणे हा होता पर्यावरण अभ्यास व आपत्ती व्यवस्थापन या विषयावर शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. अभ्यास दौऱ्या दरम्यान विद्यार्थ्यांना अभयारण्यातील विविध परिस्थिती व जैवविविधता माळढोक पक्ष्याची सध्या स्थिती त्यांच्या संवर्धनासाठी व विभाजनाकडून केले जाणारे प्रयत्न मी प्रजाती लुप्त होण्यामागची कारणे याबद्दल सविस्तर माहिती जाणून घेतली. अभ्यासू दौऱ्याच्या आयोजनासाठी महाविद्यालयाची प्राचार्य डॉक्टर सचिन फुगे यांचे मार्गदर्शन लाभले शैक्षणिक अभ्यास भेटीचे आयोजन व यशस्वीतेसाठी कृषी वनस्पतीशास्त्र विभागाच्या प्राध्यापिका सुप्रिया डोके यांनी विशेष परिश्रम घेतले प्रथम वर्षातील सर्व विद्यार्थी व शैक्षणिक भेटीसाठी उपस्थित होते.



## इथेनॉलवर चालणार स्टोव्ह, एलपीजी गॅस होणार हद्दपार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : देशात आता स्वयंपाकघरात वापरल्या जाणाऱ्या गॅसच्या ऐवजी इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हची चर्चा जोर धरू लागली आहे. केंद्र सरकारमधील मंत्री नितीन गडकरी यांनी इथेनॉलवर चालणाऱ्या कुकिंग स्टोव्हबाबत केलेल्या वक्तव्यामुळे ग्रामीण भागापासून शहरापर्यंत नवे कुतूहल निर्माण झाले आहे.

साखर कारखान्यांतून मोठ्या प्रमाणावर तयार होणारे इथेनॉल आता फक्त पेट्रोलमध्ये मिसळण्यासाठीच नव्हे, तर थेट स्वयंपाकासाठीही वा- परता येईल, असा विचार पुढे येत आहे. यामुळे घराघरात वापरल्या जाणाऱ्या एलपीजी सिलिंडरला पर्याय मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या नव्या तंत्रज्ञानात साध्या गॅस शेगडीसारखाच स्टोव्ह असणार असून त्यात इथेनॉल हे द्रव इंधन वापरले जाईल. ते जळाल्यानंतर उष्णता निर्माण होऊन स्वयंपाक करता येईल, असे सांगितले जाते. मात्र हे तंत्रज्ञान अजून पूर्णपणे बाजारात आलेले नसून त्यावर चाचण्या आणि सुधारणा सुरू आहेत.

ग्रामीण भागातील अनेक शेतकरी आणि साखर कारखान्यांशी जोडलेले घटक याकडे आशेने पाहत आहेत. कारण इथेनॉल उत्पादनात भारतात मोठी क्षमता असल्याने भविष्यात हे इंधन स्वस्त आणि सहज उपलब्ध होऊ शकते, असे मत तज्ज्ञांकडून व्यक्त होत आहे.

तरीही या पर्यायासमोर काही अडचणीही आहेत. इथेनॉलची सुरक्षित साठवणूक, वितरण व्यवस्था आणि घरगुती वापरासाठी लागणारी यंत्रणा अजून पूर्ण विकसित झालेली नाही. त्यामुळे लगेच एलपीजीला पर्याय मिळेल असे नाही, असेही तज्ज्ञ सांगतात.

सध्या सरकारकडून एलपीजीवर मोठ्या प्रमाणावर अनुदान दिले जाते. त्यामुळे इथेनॉल स्टोव्ह प्रत्यक्षात किती स्वस्त आणि व्यवहार्य ठरेल, याबाबत अजूनही चर्चा सुरू आहे.

एकूणच, इथेनॉलवर चालणाऱ्या स्टोव्हमुळे भविष्यात ग्रामीण तसेच शहरी स्वयंपाकघरातील इंधन व्यवस्थेत मोठा बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पर्यावरणपूरक आणि देशांतर्गत उत्पादनावर आधारित इंधन म्हणून या तंत्रज्ञानाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले जात आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जि माका : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह उत्तर सोलापूर या वसतिगृहाची सन २०२६-२७ या वर्षाची प्रवेश प्रक्रिया सुरु असून त्या अनुषंगाने या वसतिगृहाचे रिक्त जागेवरील प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया https://hmas.ma-hait.org या पोर्टलवर चालू झालेली असून ग्रामीण भागातील अनु. जाती, अनु. जमाती, विजाभज, इतर मागास वर्ग, आर्थिकदृष्ट्या मागास वंचित व दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांनी या वसतिगृहाच्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, अधिक माहितीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह उत्तर सोलापूर अशोक नगर, विजापूर रोड येथे संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल सुरेश काळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह उत्तर सोलापूर यांनी केले आहे.

## अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने या योजनेचा लाभासाठी अर्ज करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपस- ाधने यांचा पुरवठा करण्यात येणार आहे. सदर योजनेंतर्गत स्वयंसहाय्यता बचत गटांना त्यांचे आर्थिक उत्पन्न वाढावे या हेतूने अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना ९० टक्के (कमाल मर्यादा रक्कम रू. ३.१५ लक्ष) शासकीय अनुदानावर मिनी ट्रॅक्टर व त्याच्या उपसाधनांचा पुरवठा करण्यात येईल. स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपस- ाधने खरेदी करण्याची कमाल मर्यादा रक्कम रू.३.५० लक्ष इतकी राहील. स्वयंसहाय्यता बचत गटांनी कमाल मर्यादा रक्कमेच्या १० टक्के म्हणजे रक्कम रू. ३५,०००/- स्वहिस्सा भरल्यानंतर सदर योजनेचा लाभघेता येईल.

अटी व शर्ती

बचत गटातील सदस्य महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असावेत.

बचत गटातील ८० टक्के सदस्य हे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील असावेत तसेच बचत गटाचे

अध्यक्ष व सचिव हे अनुसूचित जातीचे असणे आवश्यक आहे.

सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र व डोमासाईल प्रम ाणपत्र आवश्यक आहे. या अगोदर संबंधीत बचत गटाने सदर योजनेचा लाभ घेतलेला नसावा तसेच यापुर्वी सदर योजनेचा लाभ

घेतला नसलेबाबतचे हमीपत्र आवश्यक आहे.

बचत गटाच्या नावे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

मिनी ट्रॅक्टर व ट्रेलर यांची नोंदणी आर.टी.ओ कार्यालयात करणे बंधनकारक आहे.

तरी सोलापूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील स्वयंसहाय्यता बचत गटांच्या विहित नमुन्यातील अर्जासाठी सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे दि. १५ जून २०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त समाज कल्याण श्रीम. सुलोचना सोनवणे, यांनी केले आहे.


**देशमुख-गायकवाड कुटुंबीयांच्या स्नेहबंधांचे भावनिक दर्शन**

**ग्रंथप्रकाशन सोहळा लातूरच्या सांस्कृतिक इतिहासात एक संस्मरणीय अध्याय ठरला**

# पावसाच्या सरीत रंगला विठ्ठलाचा पांडुरंग आत्मचरित्र प्रकाशन सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : लातूरच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक परंपरेला उजाळा देणारा एक भावस्पर्शी सोहळा नुकताच पार पडला. वत्सला बळीराम प्रकाशन केंद्र, लातूर यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या विठ्ठलाचा पांडुरंग या पांडुरंग विठ्ठलराव अंबुकगेकर यांच्या आत्मचरित्राच्या प्रकाशन सोहळ्याने उपस्थितांच्या मनावर कायमस्वरूपी ठसा उमटवला.भर पावसात, पावसाच्या रिमझिम सरी अंगावर घेत साहित्य, संस्कार आणि स्नेहाचा अविस्मरणीय संगम अनुभवायला मिळाला.



कार्यक्रमाच्या ठिकाणी अचानक सुरू झालेल्या पावसामुळे क्षणभर गोंधळ निर्माण झाला; मात्र विश्वजीत गायकवाड फाऊंडेशनच्या छत्र्यांचा आधार घेत सर्व मान्यवर आणि उपस्थितांनी कार्यक्रम अखेरपर्यंत उत्साहात पूर्ण केला. पावसाच्या साक्षीने पार पडलेला हा ग्रंथप्रकाशन सोहळा उपस्थितांसाठी आयुष्यभराची आठवण ठरला.या आत्मचरित्राचे प्रकाशन लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख, खासदार डॉ. शिवाजी काळगे, भाजपा जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी खासदार डॉ. सुनील बळीराम गायकवाड, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विश्वजीत गायकवाड, काँग्रेस लोकसभा प्रभारी जितेंद्र दहाडे, डॉ. ह. नी. सोनकांबळे तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज संग्रामसिंह भोसले महार- ाज (रांजणी संस्थान) यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रकाशन प्रसंगी बोलताना आम दार अमित देशमुख यांनी देशमुख आणि गायकवाड कुटुंबीयां मधील स्नेहबंधांविषयी भावना व्यक्त करताना सांगितले की,(राजकारणाच्या पलीकडे जाऊन जपलेली माणुसकी आणि स्नेह हीच खरी संपत्ती आहे. देशमुख-गायकवाड कुटुंबीयांचे प्रेम आणि जिव्हाळा असा कायम राहो,असे मनोगत व्यक्त करताच उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांचे स्वागत केले.

विठ्ठलाचा पांडुरंग हे आत्मचरित्र म्हणजे एका सामान्य माणसाच्या संघर्ष, कष्ट, सामाजिक जाणीव आणि आयुष्य भर जपलेल्या मूल्यांचा प्रेरणादायी प्रवास आहे. पुस्तकातील अनुभव आणि जीवनप्रव- ास अनेकांसाठी मार्गदर्शक ठरणार असल्याची भावना अनेक मान्यवरांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाला भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चना ताई पाटील चाकूरकर, शहराच्या महापौर जयश्री सोनकांबळे, विजय देशमुख, शिव- ाजी जवळगेकर, माजी पंचायत समिती सभापती अजित माने, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडित धुम ाळ, विनायक बगदुरे, समद पटेल, संजय ओहळ, डॉ. महेंद्र सोनवणे, हरिभाऊ गायकवाड, संतोष चंद्रमणी, विजयकुमार बळीराम गायकवाड, प्रियंका विश्वजीत गायकवाड, प्रता- पराव माने, बालाजी पाटील चाकूरकर, पुष्पलता अंबुलगेकर, माजी नगरस- ेवक प्रवीणकुमार पांडुरंग अंबुलगेकर, भाग्यश्री धोत्रे-बाहेती यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन प्रा. गणेश बेलंबे आणि दीपरत्न निलंगेकर यांनी केले. त्यांच्या ओघवत्या शैलीमुळे संपूर्ण कार्यक्रमाला एक वेगळी उंची लाभली.

पावसाच्या सरी, साहित्याचा सुगंध, जिव्हाळ्याची माणसं आणि भावनांनी ओथंबलेला हा ग्रंथप्रकाशन सोहळा लातूरच्या सांस्कृतिक इतिहासात एक संस्मरणीय अध्याय ठरला. कार्यक्रमाला लक्षणीय उप- स्थिती होती.

जिल्हाधिकारी कार्यालय व महसूल शाखा अंतर्गत....

# आजच्या नो व्हेकल डे मध्ये ३० अधिकारी कर्मचारी इलेक्ट्रिक बाइक, तर १२ अधिकारी-कर्मचारी सायकल वरून तर १५ जण ऑटो नी कार्यालयात आले

## जिल्हाधिकारी एस.कार्तीकेयन; जिल्हा प्रशासनाच्या परवानगीशिवाय पेट्रोल पंप विक्रेत्यावर कोणत्याही प्रकारची बंधने घालू नयेत

**■ प्रत्येक मंगळवार हा दिवस नो व्हेईकल डे म्हणून घोषित, अधिकारी- कर्मचारी यांच्याकडून चांगला प्रतिसाद**

**■ जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक शंकर कांबळे व विजय वाळा इलेक्ट्रिक बाइक ने कार्यालयात आले**



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूरने पर्यावरण संवर्धन व इंधन बचतीसाठी म हत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १८ मे च्या परिपत्रकानुसार प्रत्येक आठवड्यातील मंगळवार हा दिवस नो व्हेईकल डे म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालय व महसूल विभागाच्या विविध शाखा अंतर्गत ३० कर्मचारी इलेक्ट्रिक बाईकवरून तर १२ अधिकारी-कर्मचारी सायकल चालवत कार्यालयात आले. तर अनेक कर्मचारी सार्वजनिक वाहतूक आणि खाजगी वाहतूक व्यवस्थेचा वापर करून कार्यालयात आले, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखा, उपविभागीय कार्यालये व तहसील कार्यालयांतील अधिकारी व कर्मचारी यांना या दिवशी खाजगी दुचाकी व चारचाकी वाहने कार्यालयात आणण्यास बंदी घालण्यात आली आहे. अपरिहार्य कारणाशिवाय शासकीय वाहनांचा वापरही टाळण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या उपक्रमाचा उद्देश इंधन बचत, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर वाढवणे तसेच पर्यावरणपूरक जीवनशैलीला प्रोत्साहन देणे हा आहे. अधिकारी व कर्मचारी यांनी बस, सायकल, इलेक्ट्रिक वाहन किंवा पायी कार्यालयात येण्यास प्राधान्य द्यावे, असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. या नुसार सर्व शाखा प्रमुख, उपविभागीय अधिकारी व तहसील कार्यालयांना आदेश देण्यात आले असून, नो व्हेईकल डे चे पालन अनिवार्य राहील असे स्पष्ट करण्यात आल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक शंकर कांबळे व विजय वाळा इलेक्ट्रिक बाइक ने कार्यालयात आले

आज जिल्हाधिकारी कार्यालयात अनेक अधिकारी कर्मचारी इलेक्ट्रिक बाइक तसेच ऑटो नी येताना दिसून आले. जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहाय्यक शंकर कांबळे आणि विजय वाळा हे इलेक्ट्रिक बाइकने कार्यालयात आले. प्रधानमंत्री महोदय यांच्या आव्हानाला जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी डिझेल व पेट्रोलच्या गाड्यांचा वापर कमी करून उत्स्फूर्त प्रतिसाद देत आहेत.

शासन परिपत्रकान्वये तसेच मा. पंतप्रधान महोदयांनी, पश्चिम आशियाई पार्श्वभूमीवर देशातील नागरिकांना आवाहन केले आहे. ज्यामध्ये घरून काम करण्याची मुभा (वर्क फ्रॉम होम), अनावश्यक सोने खरेदी टाळणे, पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करून सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपयोग करणे, खाद्यतेलाचा वापर कमी करणे, रासायनिक खतांवरील अवलंबिता कमी करून नैसर्गिक शेती करणे, स्वदेशी उत्पादनाचा वापर वाढवणे व परदेश दौरे टाळणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. यानुसार उपरोक्त आदेश काढण्यात आलेले आहेत.

---

# उपविभागीय पोलिस अधिकारी समिरसिंह साळवे यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : येथील मध्यवर्ती उपविभागीय कार्यालयात समिरसिंह साळवे उपविभागीय पोलिस अधिकारी यांना वाढदिवसाच्या निमित्ताने महाराष्ट्र पोलीस मित्र सोशल असोसिएशन च्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

गोरगरीबांचा कैवारी म्हणून समिर साहेबांची ख्याती आहे.तसेच कित्येक गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांना सुधारण्यासाठी नेहमी कार्यरत असणारे श्री साळवे साहेब यांना पोलिस सोशल असोसिएशन च्या पदाधिकारींनी शुभेच्छा दिल्या.यावेळी संस्थापक सचिव सुफी सय्यद शमशोद्दीन, मराठवाडा संपर्क प्रमुख गुलाम शेख, सुरेश महामुनी, इंजि.सय्यद अमन, शेख आसिफ, शेख खालेक ईत्यादि पदाधिकारी उपस्थित होते.

# स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद कोणाची वर्णी लागणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांम धून निवडणूक निवडून देणाऱ्या विधानपरिषद सदस्यांच्या निवडणूक प्रक्रिया आज सोमवार २५ मे पासून सुरू झाले आहे. ६१६ मतदारांपैकी सुमारे ६० टक्के मत भारतीय जनता पार्टीकडे आहेत. त्यामुळे भारतीय जनता पार्टीमध्ये मोठी रेसिपी असून तिकीट कुणाला मिळणार याकडे संपूर्ण सोलापूर शहर आणि जिल्ह्याच्या नागरिकांच्या नजरा लागलेल्या आहेत विधान परिषदेसाठी अनेक दिवसापासून माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांच्या नावाचे चर्चा होते परंतु मागच्या नगरपालिका पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीला प्रचंड मोठे यश मिळवून देणाऱ्या माजी आमदार राजेंद्र राव यांच्याही नावाची आता जोरदार चर्चा आहे. दुसरीकडे पक्षाचा एकनिष्ठ आणि निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जातील भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार यांची कार्यकर्ते जोरदार मार्केटिंग करत आहे. निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी देण्याची हीच वेळ आहे त्यामुळे त्यांना भावना संधी मिळेल अशी कार्यकर्त्यांना अपेक्षा आहे.

आमदारकी सोडून पक्षाचा आदेश मानून सोलापूर लोकसभा लढवणारे राम सातपुते यांच्या नावाची चर्चा आहे. त्यांनी माळशिरस मध्ये मोहिते पाटील गटाला चांगली टक्कर देत आपले बस्तान बसवले आहे दरम्यान मागील काही दिवसात आमदार सुभाष देशमुख यांची पुत्र रोहन देशमुख यांचेही नाव अचानक आघाडीवर आले. रोहन देशमुख यांच्या नावाची पुण्यातून सुत्रे हलवली गेली. पण जिल्हा परिषदेवर एका बाजूला कट्टर कार्यकर्त्यांनी सांगितले की रोहन बघायचे नाव अचानक माझे पडले आणि राजा राऊत यांचे नाव



पुढे आले आहे त्या कार्यकर्त्याच्या तोंडून शहाजी भाऊजी नाव काही निघाले नाही.

या विधान परिषदेसाठी नाम देखीलपत्र स्वीकृती आणि विक्रीची प्रक्रिया सोमवारपासून सुरू झाली या तारखेपर्यंत नामनिर्देशन पत्र दाखल करता येणार आहे. त्यामुळे अजून बराच वेळ असल्याने भारतीय जनता पार्टी कडून कुणाचे नाव समोर येते याची उत्सुकता आहे दरम्यान माजी आमदार दिलीप दिलीप माने हे सुद्धा या निवडणुकीसाठी इच्छुक असून ते मुंबईमध्ये तळ ठोकून असल्याचे सांगण्यात आले त्यांचे मित्र जयकुमार गोरे ही जिल्ह्याची पालकमंत्री असल्याने दिलीप मालकाची ही अपेक्षा वाढले आहे.

ज्या पद्धतीने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यसभेसाठी कोणाचेही ध्यानीमनी नसलेल्या प्राध्यापिका ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देऊन खासदार केले त्याच पद्धतीने भारतीय जनता पार्टी सोलापूरला सुद्धा कोणत्या लाडक्या ताईला अचानक उमेदवारी देणार का असेही शक्यता वर्तवली जात आहे.

---

# खासदार प्रणिती शिंदे यांनी दिलीप धोत्रे यांची भेट घेऊन केली तब्येतीची विचारपूस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या गाडीचा काही दिवसांपूर्वी पुणे-मुंबई महामार्गावर भीषण अपघात झाला होता. या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. पुण्यातील खासगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. उपचारानंतर प्रकृतीत सुधारणा झाल्याने ते नुकतेच पंढरपूर येथील त्यांच्या निवासस्थानी परतले आहेत.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाच्या खासदार प्रणिती शिंदे यांनी पंढरपूर येथे जाऊन दिलीप धोत्रे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट घेत त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी खासदार शिंदे यांनी अपघातानंतरच्या उपचारांची माहिती घेत धोत्रे यांना धीर देत लवकरात लवकर पूर्णपणे बरे व्हावे, अशा शुभेच्छा दिल्या.

अपघाताची माहिती समोर आल्यानंतर राज्यभरातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातून दिलीप धोत्रे यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यात आली होती. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही दूरध्वनीद्वारे त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती. तसेच विविध पक्षांतील अनेक नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी प्रत्यक्ष भेटी देत त्यांना धीर दिला.

दिलीप धोत्रे यांच्या प्रकृतीत दिवसेंदिवस सुधारणा होत असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात येत असल्याने पंढरपूर येथील सामान्य नागरिकांसाठी कायम म दतीला धावून येणारे धोत्रे यांच्या पाठीशी साक्षात विठ्ठल असल्याची भावना व्यक्त होत आहे.



# साखरखेर्डा येथील वीज वितरण कंपनीत कंत्राटी कामगार कर्मचाऱ्याचा विद्युत पोलवर काम करताना विजेचा धक्का लागून मृत्यू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : झाल्याची दुर्दैवी घटना आज २६ मे रोजी पिंपळगाव सोनारा शिवारात घडली. मृत कामगाराचे नाव बद्रीनाथ लक्ष्मण लंबे (वय ३५) असे आहे.

२५ मे रोजी सायंकाळी वादळामुळे साखरखेर्डा परिसरातील वीजपुरवठा खंडित झाला होता. तब्बल पाच तासांनंतर रात्री १० वाजताच्या सुमारास काही भागातील वीजपुरवठा सुरू करण्यात आला. मात्र ग्रामीण भागातील काही ठिकाणी अजूनही वीजपुरवठा बंद होता. रात्री उशिरापर्यंत वीज वितरण कंपनीच्या कंत्राटी कामगारांनी दुरुस्तीचे काम सुरू ठेवत वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. पिंपळगाव सोनारा परिसरातील दुरुस्तीचे काम बाकी असल्याने बद्रीनाथ लंबे हे सकाळी सुमारे ९ वाजता मारोती आश्रू वायाळ यांच्या शेतातील ट्रान्सफॉर्मरजवळील वीज वाहक पोलवर चढून काम करत होते. यावेळी अचानक त्यांचा वीज वाहक तारेला स्पर्श झाला आणि त्यांना जबरदस्त विजेचा धक्का बसला. गंभीर भाजल्याने ते खाली कोसळले.



घटनास्थळी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी तत्काळ त्यांना साखरखेर्डा येथील डॉ. विशाल मगर यांच्या रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने डॉक्टरांनी त्यांना पुढील उपचारासाठी चिखली येथे हलविण्याचा सल्ला दिला. चिखली येथे पोहोचल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून शिंदी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

---

**सोलापूर जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक**

**बैठक प्रत्येक महिन्याला घेण्याचे निर्देश**

# जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली अक्कलकोट व चिंचोली एमआयडीसी मधील प्रश्नांवर चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा उद्योग मित्र समिती सभेची बैठक दि.२० मे रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीस इंडस्ट्रियल असोसिएशन, अक्कलकोट रोड चखऊ व चिंचोली चखऊ चे सदस्य व अधिकारी तसेच महापालिका अधिकारी उपस्थित होते.

यावेळी इंडस्ट्रियल असोसिएशनच्या वतीने औद्योगिक वसाहतींमध्ये पायाभूत सुविधांची कमतरता असल्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या समोर मुद्दे मांडण्यात आले. विशेषतः अक्कलकोट चखऊ मध्ये पाणीपुरवठा, खराब रस्ते, ड्रेनेज लाईन आणि रस्त्यावरील लाईट या प्रमुख समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले.

तसेच शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये टेक्स्टाईल शाखा सुरू करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. पाण्याच्या समस्ये संदर्भात महापालिका आयुक्तांच्या समवेत बैठक घेण्याबाबतही असोसिएशनने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन विनंती केली.

दरम्यान, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेन यांनी औद्योगिक वसाहतीमध्ये आवश्यक सुविधा पुरविणाऱ्या महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांना सूचना करून येणाऱ्या अडचणींबाबत चर्चा केली.

चखऊ मधील रस्त्यांच्या कामांसाठी शासनाकडून ७५ टक्के, महापालिकेकडून १२.५ टक्के आणि उर्वरित १२.५ टक्के हिस्सा जिल्हा नियोजन व विकास समितीद्वारे उपलब्ध करून देण्यास सुकाणू समितीने मागील बैठकीत मान्यता दिली होती. याबाबत अंमलबजावणी लवकरात लवकर करण्याचे निर्देश देण्यात आले.

अतिक्रमण काढण्याबाबत कडक कारवाईचे आदेश एमआयडीसी परिसरातील अतिक्रमण काढण्याबाबत सूचना देण्यात आल्या. अतिक्रमण करणारे आणि त्यांना मदत करणारे या दोघांवरही कारवाई करण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले.

बैठक प्रत्येक महिन्याला घेण्याचे निर्देश

तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक उमेशचंद्र दंडगव्हाळ यांना बैठक दर तीन महिन्यांनी न घेता प्रत्येक महिन्याला घेण्याबाबत सूचना देण्यात आली. प्रत्येक विभाग प्रमुखांनी एमआयडीसी संदर्भातील संबंधित अडचणींचा आढावा घेऊन पुढील पंधरा दिवसांच्या आत तो विषय बैठकीत मांडावा, अशा सूचना देण्यात आल्या.

यावेळी बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, पॉलीटेक्निक कॉलेज आर. व्ही. मुंडे, डायरेक्टर यंत्रमाग संघ नारायण आडकी, उपाध्यक्ष टेक्सटाईल फाउंडेशन सोलापूर जयंत श्री अकेन, जनसंपर्क अधिकारी



टेक्स्टाईल फाउंडेशन सुजय निकते , इंडस्ट्रियल असोसिएशन सेक्रेटरी शिवशंकर आंधळकर, व्यवस्थापक सोलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन एस. बी. गायकवाड, एस.टी. राठोड प्रादेशिक अधिकारी एमआयडीसी एस.टी. राठोड. उप अभियंता बी.पी. खंदारे, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालक ओंकार चौरे, जिल्हा विकास व्यवस्थापक नाबार्ड नितीन शेळके, जिल्हा उद्योग केंद्र राजशेखर शिंदे, सीनियर कन्सल्टंट पुणे श्रीजीत नायर, जी.डी बाबर खादी ग्रामोद्योग मंडळ आदी महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.